दूरध्वनी क्रमांक : २२०४१८०३/
२२०४२८६६

क्र. निशि/मागणी/२०१५/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र. ३०९
नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा
यांचे कार्यालय, एक्सप्रेस इमारत, २ रा मजला,
चर्चगेट, मुंबई-४०० ०२०
दिनांक - २४ /०४/२०१५.

प्रति,

१. सर्व उपनियंत्रक शिधावाटप, परिमंडळ कार्यालये

२. सर्व शिधावाटप अधिकारी, शिधावाटप कार्यालये

विषय :- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी अन्नधान्याचे मासिक सुधारीत उर्वरीत नियतन माहे मे, २०१५.

संदर्भ :- १. क्र.असुका-२०१५/प्र.क्र. ३९/नापु. २२ दि. २७मार्च,२०१५.
२. क्र. निशि/मागणी/२०१५/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र. २३३ दि. ०४.०४.२०१५.
३. क्र. निशि/मागणी/२०१५/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र. २६८ दि. १३.०४.२०१५.

शासनपत्र क्र.असुका २०१५/प्र.क्र. ३९/नापु.२२ दि. २७ मार्च, २०१५ अन्वये मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत माहे मे, २०१५ करीता प्राधान्य कुटुंबातील ८८०७६३७ लाभार्थी सदस्य संख्येसाठी १७६१५ मे. टन तांदूळ व २६४२३ मे. टन गहू असे एकूण ४४०३८ मे.टन अन्नधान्याचे नियतन मंजूर करण्यात आले आहे. प्रत्यक्षात माहे जानेवारी, २०१५ अखेरची प्राधान्य कुटुंब योजनेची लोकसंख्या ही ८८६६३४४ अशी आहे.

सदर नियतनाच्या अनुषंगाने माहे मे, २०१५ करिता राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ च्या प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी अन्नधान्याचे परिमाण प्रति व्यक्ति ५ किलो अन्नधान्य (तांदूळ २ किलो व गहू ३ किलो) असे आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. २ नुसार सर्व अधिकृत शिधावाटप दुकानांना प्रथम चरणात प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांकरीता १००% आवश्यकतेनुसार माहे एप्रिल, २०१५ च्या नियतनात दर्शीयलेला माहे मे, २०१५ करीता शिल्लक ठेवावयाचा साठा वजा करुन ५०% नियतन निर्गमित करण्यात आले आहे व संदर्भ क्र. ३ नुसार माहे मार्च, २०१५ अखेरील शिल्लक साठा वजा करुन तसेच प्रथम चरणात नियतन

मंजूर करताना उर्वरीत नियतनामधून वजा करावयाचा साठा वजा करून नियतन मंजूर करण्यात आले आहे.

माहे मे, २०१५ च्या नियतनाकरीता माहे मार्च, २०१५ अखेरचा अधिकृत शिधावाटप दुकानातील प्रत्यक्ष शिल्लक साठा दर्शवितांना अधिकृत शिधावाटप दुकानदारांकडून चुकीची माहीती प्राप्त झाल्याने पर्यायाने शिधावाटप कार्यालयांकडून व परीमंडळ कार्यालयांकडून चुकीची प्रत्यक्ष शिल्लक प्रधान कार्यालयाचे संगणक नस्तीत दर्शविण्यात आल्याने, काही अधिकृत शिधावाटप दुकानदारांकडून शिधावाटप कार्यालयांमार्फत, दुकानांना कमी नियतन मंजूर झाल्याबाबतच्या प्राप्त विनंती अर्जानुसार, सुधारीत नियतन मंजूर करणे आवश्यक ठरले आहे. याकरीता माहे मार्च, २०१५ च्या मंजूर नियतनानुसार प्रत्यक्ष विक्री वजा जाता अधिकृत शिधावाटप दुकानातील प्रत्यक्ष शिल्लक साठ्याचा सुधारीत अहवाल परीमंडळ कार्यालयांकडून मागविण्यात आला. सदर साठा कळवितांना एप्रिल, २०१५ करीता झालेली आवक व माहे फेब्रुवारी, २०१५ चा शिल्लक साठा (जो एप्रिल, २०१५ च्या नियतनाकरीता वापरण्यात येणार होता) वगळून परिमंडळ कार्यालयांनी सुधारीत साठा कळविल्यानुसार माहे मे, २०१५ करीता निर्गमित करावयाचे सुधारीत मंजूर नियतन करण्यात येत आहे .

सदर नियतन निर्गमित करताना दुकानदारांकडील प्रत्यक्ष शिल्लक साठा विचारात घेतला असल्याने, माहे एप्रिल, २०१५ चे नियतनातील शेवटच्या रकान्यात माहे मे, २०१५ करीता शिल्लक ठेवावयाचा साठा हा रद्द करण्यात आला असून ज्या दुकानदारांकडे माहे मार्च, २०१५ मध्ये त्यांना यापूर्वी मंजूर करण्यात आलेले नियतन व प्रत्यक्ष शिल्लक साठा वजा केल्यानंतर १००% नियतनातील फरक यामध्ये यापूर्वी मंजूर नियतन जास्त ठरत असल्यास असा साठा माहे जून, २०१५ करीता शिल्लक ठेवण्यात यावा.

माहे मे, २०१५ करीता अधिकृत शिधावाटप दुकानाच्या १००% आवश्यकतेनुसार माहे मार्च, २०१५ अखेर दुकानात शिल्लक असलेला प्रत्यक्ष शिल्लक साठा वजा करून १०० % नियतन मंजूर करण्यात येत असून यापूर्वी निर्गमित नियतन व प्रत्यक्ष गरज यातील फरक सुधारीत नियतन म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

परिमंडळ कार्यालयांनी कळविलेली सुधारीत प्रत्यक्ष शिल्लक साठयाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ. क | परि मंडळ | एकूण | | माहे मार्च, २०१५ अखेर प्रत्यक्ष शिल्लक साठा | |
|---|---|---|---|---|---|
| | | शिधापत्रिका | लोकसंख्या | तांदूळ (प्रति व्यक्ति २ किलो) | गहू (प्रति व्यक्ति ३ किलो) |
| १ | अ | २२३६९४ | ९८१०२९ | १५३.३२० | २४२.५८५ |
| २ | ह | २४७४५४ | ११०२१०३ | १९६.६४३ | २८४.९१२ |
| ३ | ई | ५३६९९५ | २५११७२१ | १४८.०९४ | २३३.१८० |
| ४ | ग | २६११८२ | ११९७१३७ | २१.२४२ | ४२.३५६ |
| ५ | फ | ६१४८३४ | ३०७४३५४ | २५.८२६ | ७६.२७७ |
| एकूण | | १९७२१५९ | ८८६६३४४ | ५४५.१२५ | ८७९.३३० |

शिधावाटप कार्यालयांनी सादर केलेल्या सुधारीत माहीती नुसार मंजूर करण्यात येत असलेले सुधारीत नियतन खालिलप्रमाणे आहे.

**प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी माहे मे, २०१५ करीता परिमंडळनिहाय सुधारीत नियतन**

(आकडे मे.टन मध्ये)

| परी मंडळ | लोकसंख्येनुसार १००% गरज | | माहे मे, २०१५ करिता यापूर्वी मंजूर नियतन | | माहे मे २०१५ करीता प्रत्यक्ष मंजूर उर्वरीत सुधारीत नियतन | | माहे मे, २०१५ करीता एकूण सुधारीत मंजूर नियतन | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू |
| अ | ११६२.०५८ | १९४३.०८७ | १७४९.६३६ | २६५०.५७५ | ५७.१७९ | ४६.०५२ | १८०६.८१५ | २६९६.६२७ |
| ह | २२०४.२०६ | ३३०६.३०९ | १९८८.०५७ | ३००१.१२० | २२.४२९ | २४.५५४ | २०१०.४८६ | ३०२५.६७४ |
| ई | ५०२३.४४२ | ७५३५.१६३ | ४७६८.५६५ | ७१५१.५६५ | १०६.७८३ | १५०.८५८ | ४८७५.३४८ | ७३०२.४२३ |
| ग | २३९४.२७४ | ३५९१.४११ | २१३०.५०२ | ३२३७.८३२ | २४२.५३० | ३११.५८६ | २३७३.०३२ | ३५४९.४१८ |
| फ | ६१४८.७०८ | ९२२३.०६२ | ५७४७.५३८ | ८६९८.९२८ | ३७२.३९७ | ४४८.५९४ | ६१२०.९३५ | ९१४७.५२२ |
| एकूण | १७७३२.६८८ | २६५९९.०३२ | १६३८४.२९८ | २४७४०.०२० | ८०२.३१८ | ९८१.६४४ | १७१८६.६१६ | २५७२१.६६४ |

अधिकृत शिधावाटप दुकानांमध्ये शिल्लक साठ्यापैकी उर्वरित नियतनापोटी १००% साठा वापरुन त्यापेक्षा जास्त असलेला साठा हा माहे जून, २०१५ चे नियतन म्हणून शिल्लक ठेवावयाचा आहे व त्याचे समायोजन माहे जून, २०१५ करीताच्या नियतनात करण्यात येईल. सदर नियतन मंजूर करताना माहे मे, २०१५ चे नियतनात "माहे जून २०१५ करीता शिल्लक ठेवावयाचा साठा" या रकान्यातील ज्या अधिकृत शिधावाटप दुकानातुन शिल्लक ठेवावयाचा साठा दर्शविण्यात आला आहे त्या अ.शि.वा दुकानांकडे सदर साठा माहे मे, २०१५ अखेर शिल्लक राहील अशा सूचना अधिकृत शिधावाटप

दुकानदारांना आपल्या स्तरावर देण्यात याव्यात. त्याची परीमंडळ निहाय आकडेवारी खालील प्रमाणे आहे.

**परीमंडळ निहाय १००% पेक्षा जास्त ठरलेला माहे जून,२०१५ करीता शिल्लक ठेवावयाचा साठा**

(आकडे मे.टन मध्ये)

| अ.क्र. | परि मंडळ | एकूण प्राधान्य कुटूंब एकूण | | परीमंडळ निहाय १००% पेक्षा जास्त असलेला जून,२०१५ करता शिल्लक ठेवावयाचा साठा | |
|---|---|---|---|---|---|
| | | शिधापत्रिका | लोकसंख्या | तांदूळ | गहू |
| १ | अ | २२३६९४ | ९८१०२९ | २.८०२ | ४.७६६ |
| २ | इ | २४७४५४ | ११०२१०३ | २.९२३ | ४.४८० |
| ३ | ई | ५२६११५ | २५११७२१ | ०.००० | ०.००० |
| ४ | ग | २६११८२ | ११९७१३७ | ०.००० | ०.२६१ |
| ५ | फ | ६१४८३४ | ३०७४३५४ | ०.००० | १.३८९ |
| एकुण | | १९७२१५९ | ८८६६३४४ | ५.७२५ | १०.८९६ |

उपरोल्लेखित शिल्लक साठा हा यापूर्वीच अधिकृत शिधावाटप दुकानात उपलब्ध असून प्रत्यक्षात त्या दुकानांची १००% आवश्यकता पूर्ण झाल्याने त्या दुकानांचे समोर मंजूर नियतनात ०.०० (निरंक) अशी आकडेवारी दर्शविण्यात आली आहे. सदर नियतन हे व्यक्तीनिहाय व दुकाननिहाय मंजूर करण्यात येत असल्याने वजा (उदा.-३५,-४५ वगैरे) आकडेवारी दुकाननिहाय नियतनात दर्शविल्यास त्या शिधावाटप कार्यालयाचे एकूण मंजूर नियतन प्रत्यक्ष गरजेपेक्षा कमी होत असून अन्य शिधापत्रिकाधारक वंचित राहू नयेत म्हणून सदर अतिरीक्त साठा हा स्वतंत्र रकान्यात दर्शविण्यात येत आहे. माहे मे, २०१५ करीता सर्व अधिकृत शिधावाटप दुकानांना धान्य साठा मंजूर करण्यात आला आहे .

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत शिधापत्रिकाधारकांना विहीत वेळेत अन्नधान्य पोहोचण्याच्या व उचल पूर्ण होण्याच्या दृष्टिकोनातून माहे मे, २०१५ करीता प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी वितरण आदेश त्वरीत प्राप्त करुन घेण्याच्या सूचना संघटीत संस्थांना द्याव्यात. तथापि १००% वितरण आदेश दिनांक २९.०४.२०१५ पर्यंत प्राप्त करुन घ्यावेत. संलग्न संस्थांनी या योजनेतील अन्नधान्याची उचल कोणत्याही परिस्थितीत दि. ३०.०४.२०१५ पर्यंत १००% पूर्ण करावी.

गोदामातून उचल केलेले अन्नधान्य विहित मुदतीत सर्व संबंधित शिधापत्रिकाधारकांना पोहोचेल याची सर्व परिमंडळ उपनियंत्रक शिधावाटप यांनी खबरदारी घ्यावी व त्यासाठी आवश्यक ती उपाय योजना करुन उक्त परिपत्रकांतील आदेशाची अंमलबजावणी करावी.

अधिकृत शिधावाटप दुकानदारांनी अन्नधान्याची मागणी न नोंदविल्यास अथवा संघटित संस्थांनी मुदतीत १०० % धान्याची उचल न केल्यास त्यांचेविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात यावी.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करण्यात येणाऱ्या शिधाजिन्नसांचा गैरव्यवहार होणार नाही याची दक्षता उप नियंत्रक शिधावाटप व शिधावाटप कार्यालयातील अधिकारी /कर्मचारी यांनी घ्यावी. त्यासाठी अधिकृत शिधावाटप दुकानांच्या मानकाप्रमाणे व रोस्टरनुसार नियमित व अचानक तपासण्या कराव्यात. तसेच या कार्यालयाचे परिपत्रक दि. २२/०७/२००९, दि. ३०/०७/२००९ तसेच आय. डी. टी. बाबत पत्र दिनांक ०५/०१/२०१० मध्ये दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

या नियतनापैकी उचल व वाटप केलेल्या अन्नधान्याचा साप्ताहीक तसेच पाक्षिक अहवाल न चुकता या कार्यालयास तसेच उपसंचालक, नागरी पुरवठा (गो/वा) यांना पाठवावा.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा
मुंबई.

प्रत माहितीस्तव अग्रेषित :-

१. मा. राज्यमंत्री, अनापु व ग्रासंवि आणि साबांवि, मंत्रालय, मुंबई.
२. मा.खासदार, सर्व मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र, ( संबंधीत परिमंडळामार्फत )
३. मा.आमदार, सर्व मुंबई /ठाणे शिधावाटप क्षेत्र, ( संबंधीत परिमंडळामार्फत )
४. मा.महापौर, मुंबई, नवी मुंबई,ठाणे,कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, मिरा-भाईंदर महानगरपालिका(संबंधीत परिमंडळमार्फत)
५. मा.आयुक्त, महानगरपालिका, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, मिरा-भाईंदर महानगरपालिका (संबंधीतपरिमंडळमार्फत)
६. मा.नगराध्यक्ष, अंबरनाथ, बदलापूर. ( संबंधीत परिमंडळमार्फत )
७. उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, ४२ सर वि.ठा.मार्ग, मुंबई
९. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.२२ व २८ अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
१०. पर्यवेक्षक अधिकारी, श्रम मंत्रालय,७१ बी श्रम साफल्य, एन.जी.आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई ७१.
११. रेशनिंग कृती समिती, ,.आर.एच.४,सी - ४,लेन- ८, सेक्टर ९ सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई १४.
१२. श्री. रेडकर संघटक, घरकाम मोलकरीण संघटना, भुपेश गुप्ता भवन, ८५-सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई.
१३. घरकाम मोलकरीण संघटना, मुंबई जिल्हा अंधेरी, घनःश्याम पाटील चाळ,एस.व्ही.रोड,अंधेरी (प), मुं-५८
१४. विशेष कार्यकारी अधिकारी, कामगार आयुक्तांचे कार्यालय, कामगार भवन, सी-२०, ई ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू.), मुंबई-५१.
१५. संदीप सुमन,रेशनिंग व जिविका हक्क संघटना, नवीन बीडीडी चाळ नं. १५/५६, महात्मा ज्योतिबा फुले मार्ग, नायगांव, मुं. १४.